## पब्लिक डाटा एंट्री (PDE) मध्ये PAN CARD नुसार माहिती भरण्यासंदर्भात सूचना

| | | |
|---|---|---|
| | **जर PAN Card वरील संपुर्ण माहिती व PDE मधील भरलेली माहिती यामध्ये काही तफावत असेल अशावेळी PAN Verify होणार नाही, परिणामी PDE अपुर्ण राहील व दस्त नोंदणी होणार नाही याची नोंद घ्यावी.** | |
| | **डाटा एन्ट्री करतांना येणाऱ्या काही त्रुटी/प्रश्न व त्याची उत्तरे** | |
| | जर पक्षकार वैयक्तिक (Individual) असेल तर | जर पक्षकार कंपनी किंवा इतर संस्था प्रकाराशी संबंधित असेल तर (वैयक्तिक सोडून) |
| | पक्षकाराचे नाव, मधले नाव (असेल तर), आडनाव, जन्मतारीख, व PAN Number हे PAN Card वरील माहितीशी Spelling सह तंतोतंत जुळले पाहिजे तरच PAN Verification होईल व डाटा एन्ट्री पूर्ण होईल. | कंपनी, फर्म, ऑर्गनाइझेशन इत्यादीचे नाव, Date of Incorporation, व PAN Number हे PAN Card वरील माहितीशी Spelling सह तंतोतंत जुळले पाहिजे तरच PAN Verification होईल व डाटा एन्ट्री पूर्ण होईल. |
| | | |
| | **प्र. १** PAN Number बरोबर टाकला आहे पण PAN Verify करताना Name Does not Match अशी त्रुटी येत असेल तर काय करावे?<br>**उत्तर** - जर PAN Number बरोबर टाकला असेल आणि Verify करताना वरील त्रुटी येत असेल तर डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेले पक्षकराचे नाव, मधले नाव, आडनाव, हे Spelling सह PAN Card वरील माहितीशी तंतोतंत जुळते का ते पाहावे व आवश्यकतेनुसार नावामध्ये योग्य बदल करावा. | **प्र. १** PAN Number बरोबर टाकला आहे पण PAN Verify करताना Name Does not Match अशी त्रुटी येत असेल तर काय करावे?<br>**उत्तर** - जर PAN Number बरोबर टाकला असेल आणि Verify करताना वरील त्रुटी येत असेल तर PDE मध्ये प्रविष्ट केलेले कंपनी, फर्म, ऑर्गनायझेशन, इ. चे नाव, हे Spelling सह PAN Card वरील माहितीशी तंतोतंत जुळते का ते पाहावे व आवश्यकतेनुसार डाटा एन्ट्री मधील नावामध्ये योग्य बदल करावा. |
| | **प्र. २** PAN Number बरोबर आहे व डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेले पूर्ण नाव पण बरोबर आहे तरी DOB does not Match अशी त्रुटी येत असेल तर काय करावे?<br>**उत्तर** - अशावेळी आपण डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेली पक्षकाराची जन्मतारीख व PAN Card वरील जन्मतारीख पडताळून घ्यावी व PAN Card नुसार आवश्यक तो बदल करावा. | **प्र. २** PAN Number बरोबर आहे व डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेले कंपनीचे नाव पण बरोबर आहे तरी DOB does not Match अशी त्रुटी येत असेल तर काय करावे?<br>**उत्तर -** अशावेळी आपण डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेली कंपनी, फर्म, ऑर्गनायझेशन, इ. ची Date of Incorporation व PAN Card वरील Date of Incorporation पडताळून घ्यावी व PAN Card नुसार आवश्यक तो बदल करावा. |
| | **प्र. ३** डाटा एन्ट्री मधील पक्षकारचे पूर्ण नाव आणि जन्मतारीख PAN Card वरील माहितीप्रमाणे अचूक नमूद केले आहे तरी PAN Not Verify अशी त्रुटी येत असेल तर काय करावे?<br>**उत्तर** - वरिल प्रमाणे माहिती भरून जर अशी त्रुटी येत असेल तर आपण डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेला PAN Number बरोबर आहे का याची खात्री करावी. | **प्र. ३** डाटा एन्ट्री मधील कंपनीचे पूर्ण नाव आणि Date of Incorporation PAN Card वरील माहितीप्रमाणे अचूक नमूद केले आहे तरी PAN Not Verify अशी त्रुटी येत असेल तर काय करावे?<br>**उत्तर** - वरिल प्रमाणे माहिती भरून जर अशी त्रुटी येत असेल तर आपण डाटा एंट्री मध्ये प्रविष्ट केलेला PAN Number बरोबर आहे का याची खात्री करावी. |
| | **प्र. ४** मराठी मध्ये पूर्ण नाव बरोबर आहे पण English मध्ये पाहिजे तसे नावाचे अक्षरे Auto Conversion मध्ये येत नाहीत तर काय करावे?<br>**उत्तर -** अशा वेळी मराठी डाटा एंट्री मधील नावात बदल न करता फक्त English भाषेतील अक्षरांमध्ये गरजेनुसार आवश्यक तो बदल करावा व डाटा एन्ट्री पूर्ण करावी. | **प्र. ४** मराठी मध्ये पूर्ण नाव बरोबर आहे पण English मध्ये पाहिजे तसे नावाचे अक्षरे Auto Conversion मध्ये येत नाहीत तर काय करावे?<br>**उत्तर** - अशा वेळी मराठी डाटा एंट्री मधील नावात बदल न करता फक्त English भाषेतील अक्षरांमध्ये गरजेनुसार आवश्यक तो बदल करावा व डाटा एन्ट्री पूर्ण करावी. |

# इतर माहिती

- यापूर्वी POA ची Entry करतांना पक्षकारांकडून एकाच नावाच्या Field मध्ये सर्व पक्षकारांचे नावे लिहिण्यात येत होते, परिणामी Other Party Category चा वापर होत नव्हता.

  **उदाहरण -**

  लिहून देणार मे नेक्सस गुलमोहर सो. तर्फे अधिकृत हस्ताक्षरकर्ता अजय भोसले तर्फे कु. मु. सर्वेश सिंग

  यामध्ये लिहून देणार १ party type select करुन ३ वेगवेगळ्या पक्षकाराची Entry केलेली आहे.

- आताच्या बदलानुसार खालील प्रमाणे Entry करावे

  **उदाहरण** -

  १. कंपनी = नेक्सस गुलमोहर    २. अधिकृत हस्ताक्षरकर्ता = अजय भोसले    ३. कु. मु. = सर्वेश सिंग

  अश्या ३ वेगवेगळ्या Entry करणे अपेक्षित आहे.

- मुख्य पक्षकार जसेच लिहून घेणार व लिहून देणार यांच्याव्यतिरिक्त कोणत्याही पक्षकारास (कु. मु. , मान्यता देणार इ.) PAN Verification करणे बंधनकारक नाही.